भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-१९/०७/२०१७

# प्रेसनोट.

## रात्रीच्या वेळी हायवे परिसरात जबरी चोरी करणारी टोळी अटकेत

### भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

दिनांक २२/०६/२०१७ रोजी रात्रौ ११.०५ वा.सुमारास इसमनामे वसंत चांगदेव ननवरे वय.५८ वर्ष रा. गोसावी कॉम्पलेक्स पाचवा मजला मांगडेवाडी कात्रज पुणे हे कात्रज चौक येथे उतरुन तेथुन राहते घरी पायी जात असताना नॅचरल मार्बलचे समोर, कात्रज मांगडेवाडी रोड कात्रज पुणे येथे आले असता, रोडचे कडेला उभ्या असलेले ट्रकचे आडोशास थांबलेले अनोळखी इसमांनी त्यांना पकडून हाताने मारहाण करुन हातातील लोखंडी रॉडचा धाक दाखवून शिवीगाळी करुन त्याचे खिशातील रोख रक्कम, मोबाईल हॅन्डसेट, इतर महत्वाची कागदपत्रे असा कि.रु ६१००/- रु माल बळजबरीने काढून घेवून काळे मोटार सायकलवरुन कात्रजचे दिशेने पळून गेलेले आहेत म्हणुन गुन्हा नोंद आहे.

दि.१८/०७/२०१७ रोजी पो.उप-निरी शिवदास गायकवाड त्यांचे पथकासह पोलीस ठाणे हददीत गंभीर गुन्हयांना प्रतिबंध व्हावा पेट्रोलींग करीत असताना पेट्रोलींग करीत करीत कात्रज चौक येथे आले असता पोलिस **कर्मचारी प्रदीप गुरव व विनोद भंडलकर** यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सुमारे २० ते २५ दिवसापुर्वी रात्रीच्या वेळी नॅचरल मार्बलचे समोर, कात्रज मांगडेवाडी रोड कात्रज पुणे येथे रस्त्याने जाणारे एका इसमास अडवुन त्यास मारहाण करुन लुटमार करणारे इसम हे हिरो होंडा शाईन मोटार सायकलसह वंडरसिटी शेजारील गल्लीमध्ये थांबलेले असुन ते अंदाजे १८ ते १९ वयोगटातील आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी ताबडतोब सदरची माहीती श्री विजयसिंह गायकवाड सो वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो व राजकुमार वाघचवरे पोलीस निरीक्षक (गुन्हे) भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांना कळविली असता त्यांनी दिल्याने बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा लावुन वॉच केला असता बातमीत मिळालेले ठिकाणी बातमीतील इसम थांबले असल्याचे दिसल्याने बातमीप्रमाणे स्टाफचे मदतीने त्यांना हिरो होंडा मोटार सायकल सह जागीच पकडुन त्यांना आहे त्या स्थितीत ठेवुन त्यास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव पत्ता १). ओकांर सुनिल सावंत वय.१९ वर्ष रा. स.नं १५ विघ्नहर्ता रेसीडेन्सी फ्लॅट नं ३४ आंबेगाव पठार पुणे २) सोन्या ऊर्फ प्रतिक राजु साळवी वय.१९ वर्ष रा. किनारा हॉटेलमागे जाधववाडा कात्रजगाव पुणे व त्याचे दोन अल्पवयीन साथीदार ताब्यात घेतलेले असुन त्यांचे ताब्यात एक मोटार सायकल व एक मोबाईल हॅन्डसेट असा कि.रु ४०,५००/-रु चा माल मिळुन आलेला आहे.दाखल गुन्हयाचा पुढील तपास तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड हे करीत आहेत.

**ही कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो, अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे, मा.श्री डॉ.प्रविण मुंढे सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे, मा.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री विजयसिंह गायकवाड सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, राजकुमार वाघचवरे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड, पो.कर्मचारी प्रदीप गुरव, विनोद भंडलकर, गणेश सुतार, श्रीधर पाटील, समीर बागसिराज,बाबा नरळे यांचे पथकाने केलेली आहे.**